**वाचा** :- १)म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील आदेश क्रमांक आरोग्य /अस्था-४/१०४४/२०१५, दि.१९/११/२०१५.

२) मा.अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील अपील क्र.७/२०१६, मधील निकालपत्र दिनांक १३/०६/२०१७.

३) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :- 02/12/२०१७

---

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**

**आदेश**

जा.क्र.आरोग्य/अस्था-४/४७९/२०१७

नाशिक दिनांक: 04/12/२०१७

श्री. टी.एस.खान, आरोग्य सेवक (पुरुष) प्रा.आ.केंद्र, वैतरणा ता.ईगतपूरी येथे काम करीत असतांना कामावर नियमीत मुख्यालयास न राहणे ,तसेच पल्स पोलीओ राष्ट्रीय कार्यक्रमात विना परवानगीने गैरहजर राहणे,वरीष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे,तसेच ग्रामस्थांच्या वारंवार लेखी तक्रारी इ.बाबत कर्तव्यात कसुर करुन महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चा नियम तीन चा भंग केला म्हणून ज्ञापन तसेच दोषारोप पत्र बजावणी करुन, प्रकरणी दोषारोपांबाबत विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन दोषारोप बजावणेत आलेनंतर श्री. खान यांनी सादर केलेला दिनांक ०९/०२/२०१३ चा खुलासा गटाकडून दिनांक २६/४/२०१३ रोजी प्राप्त झाला. सदरचा खुलासा हा असमर्थनिय असल्याने प्रस्तावित दोषारोपांबाबत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व जिल्हा सेवा (शिस्त व अपिल) नियम १९६४ चे तरतुदी नुसार सखोल चौकशी करणे क्रमप्राप्त ठरले. त्यानुसार दिनांक-१८/०३/२०१४ चे आदेशान्वये म.सहाय्यक आयुक्त चौकशी (जि.प.कर्मचारी) नाशिक विभाग, नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती केली. चौकशी अधिकारी यांनी चौकशी कामी दिनांक २५/०८/२०१४ निश्चित केली. सदर प्राथमिक तपासणीमध्ये अर्जदार यांनी त्यांचे विरुद्धचे सर्व आरोप अमान्य असल्याचे लेखी सादर केले. त्यामुळे चौकशी अधिकारी यांनी सखोल चौकशी दिनांक ०२/९/२०१४, ३/१०/२०१४, ६/१२/२०१४, २८/१/२०१५, १६/२/२०१५, ७/३/२०१५ या तारखांना केली. चौकशी अधिकारी यांनी सखोल चौकशीअंती नोंदविण्यांत आलेल्या साक्षीपुराव्यावरुन सर्व दस्तऐवजांची पडताळणी करुन अपचारी यांचे विरुद्धचे सर्व आरोप सिद्ध होत असल्याने सिद्धपराधाचे गांभिर्य विचारात घेता अर्जदार यांचेविरुध्दचे सर्व आरोप सिद्ध होतात, असा अहवाल सादर केला.

सदरचे अहवालानुसार श्री. खान यांना दिनांक २८/५/२०१५ चे अंतिम कारणे दाखवा नोटीसी द्वारे त्यांचे कार्यरत पदाच्या मुळ वेतनावर आणण्याची शिक्षा प्रस्तावित करुन त्यांचा खुलासा मागविला असता त्यांनी दि.१८/६/२०१५ रोजी खुलासा सादर केला. खुलासा असमाधानकारक असल्यामुळे नोटीसीत नमुद मुळ वेतनावर आणणेची शिक्षा अंतिम करुन तसा आदेश क्रमांक आरोग्य/आस्था४/१०४४/२०१५ दि.१९/११/२०१५ पारीत केला आहे.

सदरचे आदेशाविरुध्द श्री. खान यांनी मा.अप्पर आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचेकडेस अपील क्र.७/२०१६ दाखल केले होते. सदरचे अपीलाचे निकालपत्र मा.अप्पर आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १३/०६/२०१७ रोजी दिले. निकालपत्रात खालीलप्रमाणे आदेश पारीत करणेत आले आहेत.

१) अपीलार्थी यांचे अपील अंशतः मान्य करण्यांत येत आहे.

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी आदेश क्र.आरोग्य/आस्था-४/१०४४/२०१५, दि.१९/११/२०१५ हा सविस्तर कारणमिमांसा देऊन फेर आदेश निर्गमित करावा.

३) खर्चाबाबत आदेश नाहीत. संचिका बंद करण्यांत येऊन, अभिलेख कक्षात पाठविण्यात यावी.

४) सदर निर्णय www.edisnic.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यांत आला आहे.

मा.अप्पर आयुक्त, नाशिक यांचे निकालपत्रानुसार खालीलप्रमाणे कारणामिमांसासह फेरआदेश पारीत करण्यांत येत आहे.

श्री. खान यांना कामावर नियमीत मुख्यालयास न राहणे , तसेच पल्स पोलीओ राष्ट्रीय कार्यक्रमात विना परवानगीने गैरहजर राहणे, वरीष्ठांच्या आदेशाचे पालन न करणे, तसेच ग्रामस्थांच्या वारंवार लेखी तक्रारी असे आरोप ठेऊन ज्ञापनासह परिशिष्ट १ ते ४ बजाऊन खुलासा मागविणेत आला होता. त्यानुसार श्री.खान यांनी त्यांचा सादर केलेला खुलासा अवलोकन केला असता, त्यामध्ये त्यांनी सर्व आरोप अमान्य केले. तसेच आरोपास सादर केलेला बचावाचा खुलासा समाधानकारक नसलेने सखोल चौकशी करणेकरीता म.सहाय्यक आयुक्त चौकशी (जि.प.कर्मचारी) नाशिक विभाग, नाशिक यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती केली. चौकशी अधिकारी यांनी चौकशी कामी दिनांक २५/०८/२०१४ निश्चित केली. सखोल चौकशी दिनांक ०२/९/२०१४, ३/१०/२०१४, ६/१२/२०१४, २८/१/२०१५, १६/२/२०१५, ७/३/२०१५ या तारखांना केली. चौकशी अधिकारी यांचेसमोर श्री.खान यांना पुरेशी संधी देणेत आली होती. चौकशी अधिकारी यांचेसमोर श्री.खान हे योग्य ते पुरावे देऊन व खात्यातर्फेचे साक्षीदार यांची उलटतपासणी घेऊन आरोप कसे खोटे आहेत हे सबळ पुरावा देऊन सिध्द करु शकले नाही.

**आरोप क्रमांक १** मुख्यालयी न राहणे. हया आरोपापृष्ठयर्थ ते मुख्यालयी राहत होते असा कोणताही सबळ पुरावा सादर केला नाही. तसेच खात्याचे साक्षिदार यांनी दिलेल्या साक्षीमध्ये ते मुख्यालयी राहत नाहीत अशी साक्ष दिलेली असतांनाही, त्यांनी साक्षीदार यांना कोणतेही प्रश्न विचारले नाहीत. उलटतपासणी घेतलेली नाही.

**आरोप क्रमांक २** ग्रामस्थांच्या वारंवार तक्रारी व पल्स पोलिओ राष्ट्रीय कार्यक्रमांस विना परवानगी गैरहजर याबाबत चौकशी वेळी पल्स पोलिओ लसीकरण सत्रास उपस्थित होतो असे स्वबचावाचे निवेदनांत नमूद करतात. परंतु खात्याचे साक्षीदार यांचे उलटतपासणीची संधी असूनही उलटतपासणी घेऊन ते स्वतःचा बचाव करु शकले नाही. त्याचप्रमाणे उपकेंद्र को-हाळे येथे कार्यरत असतांना क्षेत्रिय भेटी वेळोवेळी न दिल्याने ग्रामस्थ को-हाळे हयांनी केलेल्या दिनांकीत तक्रारीबाबत तसेच पल्स पोलिओ लसीकरण सत्रास कोरपगांव अंगणवाडी येथे उपस्थित होते याबाबत अंतिम निवेदनांत काहीएक भाष्य केले नाही.

**आरोप क्रमांक ३** क्षेत्रिय भेटी कार्यक्रमात हलगर्जीपणा व विना परवानगी गैरहजर व तातडीची माहिती न देणे या आरोपाबाबत कोणतेही पुरावे न देता प्रकृती बरी नव्हती म्हणून गैरहजर होतो. दुरध्वनीवरुन वैद्यकिय अधिकारी यांना कळविले होते असे स्वबचावाचे निवेदनांत व अंतिम निवेदनांत नमूद केले आहे. खात्यातर्फेचे साक्षीदार यांची उलटतपासणी घेऊन आणि पुराव्याचे कागदपत्र याबाबत श्री. खान हे सबळ व योग्य पुरावा देऊन आरोप खोटे ठरवू शकले असते परंतु त्यांनी या संधीचाही लाभ घेतला नाही. त्यामुळे चौकशी अहवालामध्ये त्यांचे विरुध्द प्रस्तावित केलेले तीनही आरोप हे सिध्द झाले आहे.

चौकशी अहवालास शिस्तभंग विषय प्राधिकारी सहमत असल्याने श्री. खान यांना अंतिम कारणे दाखवा नोटीस दिनांक २८/०५/२०१५ देऊन मुळ वेतनावर आणणेची शिक्षा प्रस्तावित करुन सदरची शिक्षा का करण्यात येऊ नये याबाबतचा खुलासा २१ दिवसांत सादर करणेबाबत व समक्ष अजूनही काही लेखी वा तोंडी पुरावे सादर करावयाचे असल्यांस ते वरील मुदतीत सादर करावेत अशी संधी दिली होती. यावरही श्री. खान यांनी दिनांक १८/०६/२०१५ रोजी खुलासा सादर केला. त्यामध्ये प्रस्तावित शिक्षा का करु नये किंवा प्रस्तावित शिक्षा कमी करणेकामी कोणतेही पुरावे सादर केले नाहीत वा विनंतीही केली नाही. यापुर्वी दि.३१/१२/२०१२ चे ज्ञापन व दोषारोपांना जो खुलासा सादर केला तोच खुलासा केवळ दिनांक बदलून सादर केला. त्यात नविन काहीएक पुरावा वा कागदपत्र जोडले नाहीत.

तरी सर्व परिस्थिती विचारात घेता वारंवार संधी देऊनही संधीचा फायदा श्री. खान हे घेऊ शकले नाहीत. त्यामुळे प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने मी मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग-तीन कलम ४( २ ) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन श्री.टी. एस. खान ,आरोग्य सेवक, (पु.) यांना** पुढील तीन वेतनवाढी भावी काळातील वेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशा प्रकारे बंद करणेची **शिक्षा देत आहे.**

प्रस्तुत आदेशाची नोंद श्रीम.टी.एस.खान आरोग्य सेवक (पु.) यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**

**श्री.टी. एस. खान ,आरोग्य सेवक, (पु.),प्रा.आ.केंद्र वैतरणा ता.ईगतपुरी**
**व्दारा:- गटविकास अधिकारी पंचायत समिती ईगतपुरी.**

**प्रत:- गटविकास अधिकारी पंचायत समिती ईगतपुरी**

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत **श्री.टी. एस. खान ,आरोग्य सेवक, (पु.)** यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत व मुळसेवापुस्तामध्ये या आदेशाची घेतलेल्या नोंदीची प्रत इकडेस सादर करावी.

**प्रत:- अस्थापना विभाग -४ आरोग्य विभाग जि.प.नाशिक**
**प्रत:- माहीती व प्रसिद्धी कक्ष (आय टी सेल) साप्रवि जि.प.नाशिक यांना जि.प.संकेतस्थळावर प्रसिद्धी करणेसाठी**
**प्रतिलिपी - मा.अप्पर आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.**

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**जिल्हा परिषद नाशिक**